**अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने मान्यता दिलेल्या अभियांत्रिकी अभ्यासक्रमाच्या संस्थेस शासनाची मान्यता देण्याबाबत**

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग,**
शासन निर्णय क्र. सीटीसी-२०११/(१८५/२०११)/तांशि-४,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२,
दिनांक : २५ जुलै, २०११.

संदर्भ : मा. उच्च न्यायालयाची रिट याचिका क्र. ५४९८/२०११ या प्रकरणी दिलेले आदेश.

**प्रस्तावना** : रिट याचिका क्र. ८८४७/२००७ या प्रकरणी मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशावर प्राप्त झालेले कायदेविषयक अभिप्राय, इत्यादी बाबी विचारात घेऊन शासनाने शैक्षणिक वर्ष २०११-१२ करिता अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने दिनांक ३० जून, २०११ पर्यंत मान्यता दिलेल्या संस्थांना शैक्षणिक वर्ष २०११-१२ मध्ये प्रवेशप्रक्रियेसाठी पात्र ठरविण्यात आले व त्यानुसारच शासनाचे आदेश देखील निर्गमित करण्यात आले आहेत. दिनांक ३० जून, २०११ नंतर अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेची मान्यता प्राप्त झालेल्या संस्थांनी शैक्षणिक वर्ष २०११-१२ मध्ये प्रवेश प्रक्रिया न राबविता त्यांनी शैक्षणिक वर्ष २०१२-१३ मध्ये प्रवेश प्रक्रिया राबविणे शासनास अभिप्रेत आहे. परंतु श्री. गोपीनाथ महादेव वेदक प्रतिष्ठानचे जी. एम. वेदक इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी, मु. पो. व ता. तळ, जि. रायगड या महाविद्यालयाला अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने दिनांक ३० जून, २०११ नंतर मान्यता दिल्याने संस्थेने मा. उच्च न्यायालयामध्ये रिट याचिका क्र. ५४९८/२०११ दाखल केली होती. त्यावर मा. उच्च न्यायालयाने या प्रकरणी दिनांक १९.७.२०११ रोजी संस्थेच्या बाजूने निर्णय दिलेला आहे. त्यास अनुसरुन सदरहू संस्थेला त्यांचे अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रमाचे महाविद्यालय शैक्षणिक वर्ष २०११-१२ पासून सुरु करण्यास शासनाची मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय** : श्री. गोपीनाथ महादेव वेदक प्रतिष्ठानचे जी. एम. वेदक इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी, मु. पो. व ता. तळ, जि. रायगड या महाविद्यालयास शैक्षणिक वर्ष २०११-१२ पासून खालीलप्रमाणे अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रम त्या खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून सुरु करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र. | अभ्यासक्रम | प्रवेशक्षमता |
|---|---|---|
| | **अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रम** | |
| १ | मेकॅनिकल इंजिनिअरींग | ६० |
| २ | इलेक्ट्रॉनिक्स ॲण्ड टेलिकम्युनिकेशन्स इंजिनिअरींग | ६० |
| ३ | कॉम्प्युटर इंजिनिअरींग | ६० |
| ४ | इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी | ६० |
| ५ | सिव्हिल इंजिनिअरींग | ६० |

१) प्रस्तुत बाबतीत अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने विहित केलेल्या तसेच दिनांक २१ मे, १९८३ च्या शासन निर्णयान्वये विहित केलेल्या अटींची पूर्तता करणे संबंधित संस्थेस बंधनकारक राहील.

२) शासनाने विहित केलेल्या तसेच अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने विहित केलेल्या सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबत संस्थेस करारनामा करावा लागेल. तसेच संबंधित कागदपत्रांची आणि औपचारिक बाबींची पूर्तता संचालक (तंत्रशिक्षण) यांच्या संमतीने समाधानकारकरित्या करण्यात

येईल.

३) सदर अभ्यासक्रमाच्या संलग्नीकरणासाठी संबंधित संस्थेने महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४ मधील तरतुदीनुसार संबंधित विद्यापीठाची मान्यता/संलग्नीकरण घेणे आवश्यक आहे.

४) संबंधित संस्थेने संचालक (तंत्रशिक्षण) यांचेकडे आवश्यक ती संचित ठेव संयुक्त खात्यात भरुन इतर कायदेशीर बाबींची पूर्तता करावी.

५) सदर पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांचे प्रवेश शासनाने मान्य केलेल्या संबंधित अभ्यासक्रमाच्या प्रवेश नियमानुसार/पध्दतीनुसार करण्यात येतील.

६) शिक्षण शुल्क समितीने विहित केलेल्या शिक्षण शुल्कापेक्षा जास्त शुल्क संबंधित संस्थांनी आकारल्यास त्या संस्थांवर महाराष्ट्र एज्युकेशनल इन्स्टिटयूशन (प्रोहिबिशन ऑफ कॅपिटेशन फी) ॲक्ट, १९८७ नुसार कारवाई करण्यात येईल.

७) रॅगिंग संदर्भात मा. सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश व महाराष्ट्र प्रोहिबिशन ऑफ रॅगिंग ॲक्ट, १९९९ यांची कठोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी.

८) याशिवाय संचालक (तंत्रशिक्षण), महाराष्ट्र राज्य, मुंबई व संबंधित विद्यापीठ यांनी घालून दिलेल्या अन्य अटी व शर्ती लागू राहतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(भ. सं. वानखेडे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई.
कुलसचिव, मुंबई विद्यापीठ, मुंबई.
संबंधित संस्था (संचालकांमार्फत)

**प्रत माहितीसाठी** :-
अतिरिक्त सचिव (तांत्रिक), भारत सरकार, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, ७वा मजला, चंद्रलोक भवन, जनपथ, नवी दिल्ली ११०००१.
सहाय्यक शिक्षण सल्लागार (तांत्रिक), भारत सरकार, मनुष्यबळ विकास मंत्रालय (शिक्षण विभाग), पश्चिम विभागीय कार्यालय, इंडस्ट्रियल इन्शुरन्स बिल्डिंग, दुसरा मजला, चर्चगेट, मुंबई.
निवडनस्ती